
MAHAMUL03014/13/1/2012-TC
Special Issue No. 1, March 2018

ISSN : Online : 2320-8341
Print : 2320-6446

# RESEARCH FRONT

An International Multidisciplinary Research Journal




# Social and Economic Justice-
# Past, Present and Future

Prin. Dr. C. J. Khilare
Chairman

Mr. S. M. Mahajan
Editor

| | | |
|---|---|---|
| 23 | Pre-Primary Education And Justice For Anganwadi Workers **Prof. Mrs. Shamala R. Mane** | 110-113 |
| 24 | Effect of Family Type And Gender on Emotional Maturity Among Undergraduate Students **Prof. Pramila A. Surve, Prof. Ramesh S. Kattimani** | 114-118 |
| 25 | Consumer And Consumer Protection Act ,1986 : Issues And Challenges **Smt. Sampada S. Lavekar** | 119-123 |
| 26 | Gender Inequality In India **Prof. Shobha Sambhoji** | 124-125 |
| 27 | हिंदी साहित्य में अभिव्यक्ति स्वातंत्र्य **श्री काकासाहेब बापूसाहेब भोसले** | 126-127 |
| 28 | कन्हैयालाल माणिकलाल मुंशी के 'युधिष्ठिर' उपन्यास में प्रतिबिंबित धार्मिक एवं न्यायिक यथार्थता **देवकाते भागवत भगवान** | 128-131 |
| 29 | चित्रा मुद्गल के 'प्रतिनिधि कहानियों' में ग्राम्य और शहरी जीवन के विषमता का यथार्थ दर्शन **कांबळे श्रावण आबा** | 132-134 |
| 30 | नागार्जुन के काव्य में युगीन विषमता और सामाजिक आस्था एवं विश्वास के स्वर **लेफ्टनंट डॉ.रविंद्र पाटील** | 135-137 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची सामाजिक विकासाची मीमांसा **प्रा. डॉ. वासुदेव डोंगरदिवे** | 138-146 |
| 32 | महिला आरक्षणाचे राजकारण आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग-समतेच्या संदर्भात **प्रा. सौ. सुपेकर व्ही. पी.** | 147-150 |
| 33 | 'मूलभूत हक्क आणि सामाजिक न्याय' **प्रा. सुहास निर्मले** | 151-153 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पुणे करार : एक चिकित्सक अभ्यास **डॉ. विनोद संभाजी सोनवणे** | 154-157 |
| 35 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : 'स्त्री' च्या सामाजिक न्यायासाठी **डॉ. श्रीमती सिंधू जयवंत आवळे** | 158-160 |
| 36 | 'राजा राममोहन रॉय यांनी सतेप्रथेविरूध्द मिळविलेला न्याय' **प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम** | 161-164 |
| 37 | महिलांना समान न्याय व पंचायत राज्यातील त्यांचे योगदान **प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे** | 165-167 |
| 38 | पंचायतराज व्यवस्थेमधून महिला सबलीकरण : एक सामाजिक न्याय प्रक्रिया **प्रा. सचिन शंकर औवाळ** | 168-170 |
| 39 | भारतातील लिंग आधारित भेदभाव आणि न्याय **प्रा. रावसहेब सटवा कांबळे** | 171-175 |
| 40 | हिंदू स्त्रियांचे वैवाहिक हक्क आणि न्याय" **प्रा. रजनी कारदगे** | 176-178 |
| 41 | मानवी हक्क आणि शिक्षण **प्रा. अडसरे व्ही. बी.** | 179-181 |
| 42 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्याया बाबतचे विचार **प्रा. नदाफ बी. आर.** | 182-183 |
| 43 | आर्थिक कल्याण : सामाजिक न्यायाचा आधार **कुबेर दिनकर दिंडे** | 184-187 |
| 44 | विचारेमाळ झोपडपट्टीतील बालकामगार आणि सामाजिक न्याय **प्रा. कन्नाडे ममता कार्तिक** | 188-191 |
| 45 | शिवकालीन न्यायव्यवस्था **प्रा. डॉ. चंद्रकांत गिरी** | 192-195 |
| 46 | शिक्षणाचा अधिकार **प्रा. डॉ. गावडे एस. एम.** | 196-201 |
| 47 | अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट पक्षाचे जायकवाडी धरणग्रस्तांच्या लढयातील योगदान **प्रा. विधाटे गणेश शंकर** | 202-208 |
| 48 | पांगिरे प्रकरण (काशीबाई हणबर) **प्रा. डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव** | 209-210 |
| 49 | शिक्षणाचा मुलभूत अधिकार आणि बालक हक्क धोरण **श्री अजितकुमार भिमराव पाटील** | 211-220 |
| 50 | स्त्रीः "धर्म आणि न्याय" **प्रा. डॉ. नंदिनी रविंद्र रणखांबे** | 221-223 |
| 51 | सामाजिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत जगन्नाथ शंकरशेट **प्रा. उमेश गणेशराव जांभोरे** | 224-227 |
| 52 | जागतिकीकरण व न्यायः काही निरीक्षणे **प्रा. टी. वाय.रणदिवे** | 228-230 |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# जागतिकीकरण व न्यायः काही निरीक्षणे

**प्रा. रणदिवे टी. वाय.**
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर. जि.– पुणे
ई–मेलः tyrandive@gmail.com

**प्रस्तावनाः**

आधुनिक युगात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची अपरिहार्यता आज बहुतांश सर्वच राष्ट्रांनी स्वीकारलेली दिसते. मात्र गेल्या दोन दशकात नवउदारीकरणाच्या जागतिकीकरणाच्या पर्वात जे समूह उपेक्षित, पीडित, सीमांत घटक व आदिवासी या घटकांवर या प्रक्रियेचे नकारात्मक परिणाम झालेले दिसतात. जागतिकीकरणामुळे एका बाजूला मोठया प्रमाणात विकास होऊ लागला पण त्यासाठी जी धोरणे, कायदे आणले गेले त्यामुळे या वर्गाच्या पदरी घोर निराशा पडली व एकंदरीत सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक न्यायाविषयक प्रश्न उपस्थित झालेली आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत **'आत्मभान'** हरपलेल्या समाजघटकांच अध्ययन गांभीर्याने अभ्यास होणे हीसुद्धा काळाची गरज आहे. प्रस्तुत निबंधात केवळ भटके विमुक्त, पारधी समाज व आदिवासी या घटकांचा अभ्यास केला आहे.

**जागतिकीकरणाची प्रक्रियाः**

आर्थिक व्यवहारांचे शिथिलीकरण आणि जागतिकीकरण हे 1980 च्या दशकांनंतर परवलीचे शब्द झाले आहेत. वस्तू व सेवा यांचा व्यापार जागतिक स्तरांवर निर्बंधविरहित झाला तर त्यात भरपूर वाढ होईल या गृहितकावर आधारित जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. तौलनिक लाभाचा सिद्धांत आणि विकासासाठी स्पर्धा आवश्यक आहे या दोन विचारांच्या पायावर जागतिकीकरण उभे आहे. थोडक्यात देशाच्या सीमेपलीकडे आर्थिक व्यवहारांचा विस्तार करुन बाजरांवरील नियेत्रणे टप्पाटप्याने कमी करीत पूर्णतः हटविणे म्हणजे आर्थिक उदारीकरण. सर्वसाधारणपणे 'जागतिकीकरण' या शब्दाने जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये खुल्या बाजारपेठेच्या धोरणाच्या प्रसाराशी संबंधित व्यापक अशा मानवी व्यवहारांचा निर्देश होतो.

**भटके विमुक्तः**

बिटीश राजवटीपासून या समूहाकडे एका विशीष्ट चष्म्यातून बघण्यात आले. हे त्या काळच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेतल्यास हे लक्षात येते. जग हे वेगाने बदलत आहे. हे बदल सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक असण्याबरोबरच विज्ञान तंत्रज्ञानात्मक आहेत. मात्र हे बदल केवळ मुठभर व्यक्तींच्या प्रगतीचे ठरले आहेत. जग जवळ येत असताना वर्गजातीलिंग प्रभुत्वाच्या परिणामस्वरुपी गरीब–श्रीमंत विषमता फार मोठया प्रमाणात वाढताना दिसते. भारतातील भटका–विमुक्त समाज भारतीय लोकसंख्येत 15% आहे. भारतातील 15% लोकसंख्या असलेल्या भटक्या–विमुक्तांची स्थिती विदारक असल्याचे इदाते किंवा रेणके आयोगाचा अहवाल सांगतो. मात्र जागतिकीकरणानंतरही या परिस्थितीमध्ये फारसा बदल दृष्टीपथास येत नाही. अजूनही भटक्या–विमुक्तातील 60% जनता भटकत आहे. 50% जनता दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. 30% पेक्षा जास्त लोक पारंपारिक व्यवसाय करीत आहेत. तर उलटपक्षी 4% लोक सेवा क्षेत्रात आहेत. 70% लोक व्यसनाधीन आहेत. 96% लोक निरक्षर आहेत. जवळपास सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या देशामध्ये भटक्या विमुक्त जाती जमातीत जन्माला आलेले बहुसंख्य लोक उपजीविकेसाठी टाहो फोडीत वणवण करत आहेत. जागतिकीकरणाच्या पर्वात या लोकांसमोर त्याच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनला आहे. आज त्यांना त्यांचा व्यवसाय टिकवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. एकविसाव्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

शतकातील सरकारच्या नवीन ध्येय धोरणामुळे आणि आधुनिकीकरणामुळे भटक्या विमुक्त जाती जमातीचे परंपरागत व्यवसाय बंद पडले आहेत.

**पारधी समाजः**

उपेक्षित आणि पीडित आहेत त्यांच्यामध्ये पारधी जमातीचा उल्लेख करावा लागेल. पारध म्हणजे शिकार करणे. पारधी जमात ही आदिवासी समाजातील पूर्वाश्रमीची भटकी व शिकार करणारी जमात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून गावगाडयाशी कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष संबंध न ठेवता पोटासाठी अजूनही वनात भटकणा–या, फिरणा–या ज्या जाती जमाती आहेत त्यापैकी पारधी जमात ही एक आहे. पारधी जमात ही माळरानावर आढळणा–या पक्षांची व प्राण्यांची शिकार करतात. या जमातीला इतिहासाचा फार मोठा वारसा आहे. महाराष्ट्रात पारधी हे सर्वसाधारण नाव असले तरी त्यांच्यामध्ये उपगट आहेत. आडवीचिंचर, फासेपारधी, लंगोटीपसरधी, चितापारधी, शिकारी, टाकणकर, टाकिया, बहेला, गायपारधी, गावपारधी, निरशिकारी, हरणशिकारी, पालपारधी व राजपारधी.

सन १८७१ मध्ये इंग्रजांनी **'गुन्हेगारी जमाती कायदा'** केला. या कायद्यान्वये सरकारला उपद्रवी वाटणा–या अनेक जमातींना गुन्हेगार म्हणून घोषित करून त्यांच्यावर निर्बंध लादण्यात आले. त्यामध्ये पारधी ही एक जमात होती. हा कायदा अत्यंत अमानुष व अन्यायी होता. या कायद्यामुळे पूर्ण जमातच गुन्हेगार मानली गेली व पोलिसांनी त्यांचा छळवाद सुरू केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1952 साली **गुन्हेगारी जमाती कायदा** रद्द करण्यात आला व त्याच्या जागी **'सराईत गुन्हेगार कायदा'** आणण्यात आला. या कायद्यान्वये समूहाऐवजी व्यक्ती गुन्हेगार मानण्यात येऊ लागली, पण गुन्हयांचा तपास करण्याची आधीच्या कायद्याची जी पद्दत होती तीच कायम राहिली. पोलिसांच्या वागणूकीत काहीच बदल झाला नाही. आजही पारधी या जमातीकडे गुन्हेगार म्हणून बघितले जाते. सध्याच्या काळात कोणताही बदल करण्याचे किंवा होण्याचे मुख्य साधन म्हणजे शिक्षण होय. भारतात अशी अनेक उदाहरणे आहेत की केवळ वंचितच नाही तर उच्च वर्णातल्याही अनेक समूहांनी केवळ शिक्षणाच्या जोरावर आपली सामाजिक परिस्थिती बदलली. परंपरेने पारधी हा समाज निरक्षर आहे. कायम भटकंती करूनच्च जीवन जगत असल्याने शिक्षणाशी संबंध आला नाही. गेल्या पंचवीस–तीस वर्षात ही जमात जेव्हा गावात स्थिर व्हायला लागली तेव्हा शिक्षणाला सुरुवात झाली. मात्र शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. पारधी जमातीतील निवासस्थान (तांडा) गावापासून अलग जवळपास २ ते 3 कि.मी. आढळून येतात. यामध्ये सर्वसाधारणरित्या 20 टक्के घरे विटामातीची, 40 टक्के कुडामातीची व 40 टक्के पालाची घरे आढळून येतात. वर्षातील तिन्ही ऋतुंना मोठया संघर्षाने सामोरे जावे लागते. घराच्या अवतीभोवती केरकचरा, घरामध्ये मोहफुलांचा वास, घरांच्या दरवाज्या समोर जळलेल्या लाकडांची राख, फाटलेल्या कपडयातील अर्धनग्न मुले, केस वाढलेले, सांडपाण्याचा प्रश्न ई. यामुळे या जमातीमध्ये आरोग्याच्या समस्या फार मोठया प्रमाणात दिसून येतात. पारधी जमातीतील व्यवसाय एका निष्चित टप्यानंतर बदलताना दिसतोय. या जमातीचा पारंपारीक व्यवसाय शिकार करणे हा जरी असला तरी कालांतराने हा समूह थोडयाफार फरकाने 'शेती या व्यवसायाकडे वळलेला दिसतो. मात्र प्रगत 'शेती करण्याचा अभाव आहे. त्याचबरोबर ही जमात ऊसतोडणीसाठी 'शेतमजूर म्हणून काम करते. पारधी जमातीतील प्रत्येक तांडयावर मुलभूत सोयींचा अभाव दिसून येतो. उदा. वीजपुरवठा, पाणीपुरवठा आजही या भीषण प्रश्नांना त्यांना सामोरे जावे लागते. या जमातीतील व्यक्तींची जन्माची नोंद नसल्यामुळे प्रमाणपत्र मिळणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे या जमातीतील असलेल्या व्यक्तिना 'शासकीय लाभ मिळणे कठीण झाले आहे.

**आदिवासीः**

जागतिक बाजारपेठ आणि त्याचे वेगवेगळया प्रवाहांचा प्रभाव आदिवासी जनजीवनावर पडलेला दिसतो. भांडवली व्यवस्थेपूर्वी ग्रामीण व आदिवासी लोकांसाठी नैसर्गिक साधने सहजपणे उपलब्ध होते. आदिवासी लोकांसाठी तर जल, जंगल आणि जमिन सामुदायिक, सामाजिक मालमत्ता होती. परंतू जागतिकीकरणानंतर खूप मोठे बदल झाले आहेत. सद्यस्थितीत भारतात अंदाजे १५०० सिंचनविकास प्रकल्पांच्या उभारणीमुळे जवळपास ५० ते ६० दशलक्ष लोक त्यांच्या गावांपासून विस्थापीत झालेले आहेत त्यांपैकी जवळजवळ १कोटी ५० लाख विस्थापीत आदिवासी समुदायांचे लोक आहेत. जागतिकीकरण अतिदुर्गम भागापर्यंत उद्योगांची स्थापना व अन्य मार्गाने पोहोचलेले आहे. मात्र यामुळे आदिवासी समुदायाचे हक्क नाकारले जात आहेत. एकीकडे देश भव्य विकासाची स्वप्न दाखवित

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आहे मात्र काही घटक विकासाच्या कोसो दूर आहेत. राज्यातील 41.8 टक्के आदिवासी लोक भूमिहीन आहेत. इतर लोकसंख्येच्या बाबतीत हे प्रमाण 28 टक्के आहे. नियोजन आयोगाच्या एका पाहणीत 1999–2000 या वर्षात आदिवासींमधील गरिबी 41.14 टक्क्यांवरुन 45.86 टक्क्यांपर्यंत वाढली. परिणमी लाखो लोक विस्थापित होउन बेरोजगार झाले.

**निष्कर्ष:**

जागतिकीकरणांचा स्वीकार करुन आज जवळजवळ पाव शतकाचा कालखंड उलटून गेला आहे. समाजाच्या सर्वच क्षेत्रांवर विवीधांगांनी जागतिकीकरणाचे दूरगामी परिणाम झाले आहेत. या आधुनिकीकरणाने मूठभरांचे जगणे कमालीचे उजळून निघाले. मात्र समाजाच्या तळाच्या स्तरातल्या सर्वसामान्य माणसांच्या जगण्यासमोर जागतिकीकरणाने अनेक आव्हाने उभी केली आहेत. त्यांचे जगणे दिशाहीन बनले आहे. भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही तत्वे मान्य केली व सर्व व्यक्ति कायद्यापुढे समान आहेत असे मानले. भारतीय राज्यघटनेतील कल्याणकारी आणि समाजवादी तत्वांना पूर्णपणे बाजूला टाकून हा सर्व व्यवहार चालू आहे. जागतिकीकरणामध्ये समुदाय किंवा समाज नव्हे तर बाजारपेठ हीच केंद्रस्थानी आहेत. आजही हे घटक आपल्या न्याय हक्कांसाठी लढत आहेत.

**संदर्भसूची:**

१. भोळे, भा. ल., (२०१०) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
२. कुलकर्णी, पी. के., (२०१३) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड प्रकाशन, पुणे.
३. पाटील, पंढरीनाथ, (१९१०) भटके भाईबंध, सुरेश एजन्सी, पुणे.
४. बोकील, मिलिंद, पारधी बदलतायत, पण...,परिवर्तनाचा वाटसरु १ ते १५ ऑक्टोबर, २०१५, पुणे.
५. कोळेकर, संजय, १८७१चा कायदा – समाजशास्त्रीय अवलोकन, परिवर्तनाचा वाटसरु १ ते १५ सप्टेंबर, २०१७, पुणे.
६. मदने, उत्तम, जागतिकीकरण पर्व: उपजीवेकेसाठी संघर्ष, परिवर्तनाचा वाटसरु १६ ते ३१ ऑगस्ट, २०१७, पुणे.
७. देशमुख, भौमिक, जागतिकीकरण आणि आदिवासी समुदाय, परिवर्तनाचा वाटसरु १ते १५ मार्च, २०१७, पुणे.